आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

८ जून २०२४ - शनिवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या नवीन सरकारचा शपथविधी समारंभ उद्या म्हणजे रविवारी संध्याकाळी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं होणार आहे. राष्ट्रपती संध्याकाळी सव्वासात वाजता नरेंद्र मोदी आणि त्यांच्या नवीन मंत्रिमंडळाला शपथ देतील. भारताचे शेजारी देश आणि इतर मित्रदेशांचे प्रमुख या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

राज्यातल्या महायुतीच्या नेत्यांशी भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा आज संध्याकाळी दिल्लीत चर्चा करणार आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळाचा शपथविधी होईपर्यंत राजीनामा देऊ नये, असं शहा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगितलं आहे. लोकसभा निवडणुकीत रालोआला महाराष्ट्रात अपेक्षित यश न मिळाल्याची जबाबदारी घेत देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची इच्छा दर्शवली होती.

या बैठकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज वर्षा शासकीय निवासस्थानी होणारी रालोआ मित्रपक्षांचे नेते आणि नवनिर्वाचित खासदारांची बैठक रद्द केली आहे.

**<><><><>**

काँग्रेसच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आज नवी दिल्ली इथं पार पडली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पक्षाच्या नवनिर्वाचित खासदारांचं यावेळी अभिनंदन केलं. यापुढे इंडिया आघाडीतल्या मित्रपक्षांसोबत मिळून संसद आणि संसदेच्या बाहेर एकत्र काम करू, असंही खर्गे यांनी सांगितलं. दरम्यान, काँग्रेसच्या संसदीय पक्षाची बैठक आज संध्याकाळी होणार आहे.

**<><><><>**

राज्यात यंदा खरिपाच्या क्षेत्रात एक लाख दहा हजार हेक्टरने वाढ झाली असून बियाण्यांच्या आणि खतांच्या पुरवठ्याबाबत सूक्ष्म नियोजन केलं जात आहे. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी ही माहिती दिली. ते काल मंत्रालयात खरीप हंगाम पूर्व तयारीच्या अनुषंगानं खतं, बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत आयोजित आढावा बैठकीत बोलत होते. सध्याची एकूण बियाणे मागणी १८ लाख क्विंटल इतकी आहे. वाढलेल्या क्षेत्राचा विचार करून राज्य शासनानं २४ लाख क्विंटल बियाणं मंजूर केलं आहे. त्यापैकी १३ लाख क्विंटल वितरीत केलं असून आणखी ६ लाख क्विंटल वितरणाच्या प्रक्रियेत आहे. उर्वरित बियाणंदेखील वेळेत वितरीत होईल, असं नियोजन केलं जात असल्याचं मुंडे यांनी सांगितलं.

सर्व प्रकारचं बियाणं शेतकऱ्यांना योग्य भावात मिळावं, तसंच खतांचा मुबलक साठा आणि त्याचं योग्य वितरण व्हावं, यासाठी टास्क फोर्स निर्माण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोनलकर्ते मनोज जरांगे यांनी  जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं पुन्हा उपोषणाला सुरुवात केली आहे. ग्रामपंचायतीनं  आपल्या आंदोलनाला पाठिंबा दिला असून सर्व समाजातल्या गावकऱ्यांनी पाठींब्याचं लेखी पत्र दिलं असल्याची माहिती जरांगे यांनी उपोषण स्थळी आज प्रसारमाध्यमांना दिली. आपण आपल्या मागण्यांवर ठाम असून सरकारनं या मागण्या त्वरीत पूर्ण कराव्या, अन्यथा येत्या विधानसभा निवडणुकीत २८८ जागांवर उमेदवार उभे करु असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालया अंतर्गत प्लास्टिक निर्यात प्रोत्साहन परिषदेतर्फे देण्यात येणारे २०२१-२०२३ या वर्षातील 'प्लास्टिक निर्यात उत्कृष्टता पुरस्कार' राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते काल मुंबईत प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात ७५ प्लास्टिक निर्यातदारांचा 'निर्यात उत्कृष्टता पुरस्कार' ने गौरव करण्यात आला.

<><><><><>

चित्रपट आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातलं नामवंत व्यक्तिमत्व  रामोजी राव यांचं आज सकाळी हैदराबादमध्ये निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. श्वसनाला त्रास होत असल्यानं हैदराबादमधे एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. तिथंच त्यांचं निधन झालं. ईटीव्ही नेटवर्क आणि रामोजी फिल्मसिटीचे रामोजी राव प्रमुख होते.

तेलुगु, कन्नड, तमिळ आणि मल्ल्याळम भाषेतल्या मिळून ६० चित्रपटांची निर्मिती त्यांनी केली होती. त्यात काही हिंदी चित्रपटांचा समावेश होता. त्यातले प्रतिघात आणि नाचे मयूरी हे चित्रपट विशेष गाजले. नाचे मयूरीसाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कारही मिळाला होता. याशिवाय चित्रपट सृष्टीत प्रतिष्ठेचे मानले जाणारे फिल्म फेअर आणि नंदी पुरस्कारही त्यांना अनेकदा मिळाले होते.२०१६ मधे त्यांना पद्मविभूषण ने सन्मानित करण्यात आलं होतं. अनेक नवोदित कलाकरांना त्यांनी आपल्या चित्रपटांमधून प्रकाशात आणलं.

चित्रिकरणाच्या सुविधांसाठी देशोदेशी नावाजला गेलेला रामोजी फिल्म सिटी हा स्टुडिओ त्यांनी उभारला. ईटीव्ही हा १३ भाषांमधला दूरचित्रवाहिन्यांचा समूह त्यांनी सुरु केला. देशातल्या दृक्श्राव्य माध्यमात खाजगी उद्योगाची ही पहिली मोठी झेप होती. या समूहातर्फे ई नाडू वर्तमानपत्रही प्रसिद्ध होतं.

**<><><><><>**

रामोजी राव यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात आज सोसाट्याचे वारे आणि मेघगर्जनेसह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे तसंच पुढच्या पाच दिवसांत मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचीही शक्यता आहे. दरम्यान, काल रात्री सांगली जिल्ह्यात सरी बरसल्या असून पालघर इथं आज पहाटे मेघगर्जनेसह पहिल्या पावसानं जोरदार हजेरी लावली.

**//<><><><><>//**